Shree Nisargadatta Samadhi Charitable Trust, Mumbai

श्री निसर्गदत्त समाधी चॅरिटेबल ट्रस्ट, मुंबई द्वारा प्रकाशित त्रैमासिक

NISARGAVAANI

निसर्गवाणी ನಿಸರ್ಗವಾಣಿ निसर्गबानी

वर्ष २ रे अंक : ५ वा (जुलै ते सप्टेंबर २०२६)   Year 2nd Issue 5th (July - September 2026)



संपादक
डॉ. धीरज सर्वज्ञ : +91 9881314214
विजया नाझरे : +91 9403707936 स्मिता थोरात : +91 8698863395
तुषार नाईक : +91 8369105437 / 982188356

मुखपृष्ठ रचना: भरतभाई शिंपी, जळगाव
मांडणी आणि अंतर्गत सजावट
झेन प्रकाशन मुंबई (निसर्गवाणी समुहाकडून प्राप्त लेखादि साहित्या नुसार)
वेबसाईट: www.nisargdattasamadhi.in
ईमेल: nisargadattasamadhitrust2025@gmail.com

लेखकांना आवाहन

कोणत्याही मासिकाची पहिली आवश्यकता म्हणजे प्रतिथयश आणि होतकरू लेखकांकडून मासिकासाठी दर्जेदार लेख मिळविणे. आत्मज्ञान हा विषय कोणत्याही धर्म, जाती भेद या पलीकडचा आहे याचे कायम स्मरण बाळगून केवळ निसर्गदत्त महाराज यांच्या आत्मज्ञान शिकवणीचाच इथे अंतर्भाव न करता सोबत भारतातील संत-साधु यांची चरित्रे, त्यांची पारमार्थिक शिकवण, विविध संप्रदायातील पारमार्थिक शिकवण, पौराणिक कथा आदि अनेक लेखांचा आणि अर्थातच वाचकांचा प्रतिसाद आणि अभिप्राय याचाही निसर्गवाणी त्रैमासिकात समावेश करण्याचा उद्देश आहे. अध्यात्मज्ञान हे देश-कालातीत असे पवित्र ज्ञान आहे यावर आमची पूर्ण निष्ठा आहे.

उपयुक्त सूचना

या त्रैमासिकातील पृष्ठ संख्या मर्यादित ठेवण्याच्या दृष्टीकोनातून लेखकांना एक नम्र सूचना आहे की छोट्या लेखासाठी साधारण ७५० शब्द संख्या असावी, मध्यम आकाराच्या लेखा साठी साधारण १५५०० शब्द संख्या असावी आणि दीर्घ लेखासाठी साधारण २३०० पर्यंत शब्द संख्या असावी.

कृपया निसर्गवाणी त्रैमासिकाच्या खालील मेल आयडी वर आपले लेख पाठवावेत
nisargavaani240125@gmail.com

संपादकीय

नवयुग, वैयक्तिक आणि वैश्विक समस्या आणि श्री निसर्गदत्त महाराज यांची शिकवण

आजचे युग विज्ञान, तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता, जागतिकीकरण आणि माहितीच्या अभूतपूर्व वेगाचे युग आहे. मानवाने अवकाशाचा वेध घेतला, कृत्रिम बुद्धिमत्तेचा विकास केला, संवादाची साधने क्षणार्धात उपलब्ध करून दिली आणि जीवन अधिक सोयीस्कर बनवले. परंतु या भौतिक प्रगतीबरोबरच मानवी मन अधिक अस्थिर, चिंताग्रस्त आणि एकाकी झालेले दिसते. बाह्य प्रगतीचा वेग जितका वाढला, तितकी अंतर्मनातील शांतता, समाधान आणि आत्मिक स्थैर्य कमी होत गेले. आधुनिक समाजात यश, संपत्ती आणि प्रसिद्धी यांना जीवनाचे अंतिम ध्येय मानले जात असल्यामुळे मनुष्य स्वतःच्या अस्तित्वाचा खरा अर्थ विसरत चालला आहे.’.

आजच्या व्यक्तीसमोर अनेक वैयक्तिक समस्या उभ्या आहेत. मानसिक तणाव, नैराश्य, भविष्याची भीती, नोकरीची असुरक्षितता, स्पर्धेचा दबाव, नातेसंबंधांतील दुरावा आणि सततची तुलना यांमुळे मनुष्य अंतर्मुख होण्याऐवजी अधिक अस्वस्थ होत आहे. सामाजिक माध्यमांमुळे प्रत्येक व्यक्ती इतरांच्या यशाशी स्वतःची तुलना करते, त्यामुळे स्वतःच्या जीवनाबद्दल असमाधान वाढते. भौतिक सुखसुविधा वाढल्या असल्या तरी मनःशांती, आत्मविश्वास आणि आनंद यांची कमतरता जाणवते. अनेकांना “माझ्या जीवनाचा उद्देश काय?” आणि “खरा आनंद कुठे आहे?” असे मूलभूत प्रश्न सतावत असतात.

याचबरोबर संपूर्ण जगासमोरही अनेक गंभीर वैश्विक समस्या निर्माण झाल्या आहेत. हवामान बदल, पर्यावरणाचे प्रदूषण, जंगलतोड, पाण्याची टंचाई, जैवविविधतेचा ऱ्हास, युद्धे, दहशतवाद, आर्थिक विषमता आणि नैतिक मूल्यांची घसरण ही आधुनिक जगाची वास्तवता

बनली आहे. विज्ञान आणि तंत्रज्ञानाने प्रगती केली असली तरी करुणा, सहअस्तित्व, संयम आणि मानवतेची भावना अनेक ठिकाणी दुर्बल होताना दिसते. बाह्य विकास आणि अंतर्गत परिपक्वता यांमध्ये निर्माण झालेली दरी ही आधुनिक संस्कृतीसमोरील सर्वांत मोठी समस्या आहे.

या सर्व समस्यांचे मूळ काय आहे, या प्रश्नाचे उत्तर निसर्गदत्त महाराज अत्यंत सोप्या पण गहन भाषेत देतात. त्यांच्यामते मनुष्याचे मूलभूत दुःख बाह्यपरिस्थितीमुळे नसून स्वतःच्या चुकीच्या ओळखीमुळे आहे. मनुष्य स्वतःला केवळ शरीर, मन, नाव किंवा व्यक्तिमत्त्व समजतो आणि त्यातूनच अहंकार, इच्छा, भय, अपेक्षा आणि असुरक्षितता निर्माण होतात. ही चुकीची ओळखच सर्व दुःखाचे मूळ आहे.

निसर्गदत्त महाराजांच्या शिकवणीचा केंद्रबिंदू म्हणजे स्व-स्वरूपाची सत्य-नित्य ओळख करून घेणे. ते सांगतात की प्रत्येक विचार, भावना, इच्छा आणि अनुभव यांच्याआधी **"मी आहे"** ही जाणीव अस्तित्वात असते. ही जाणीव कोणत्याही नाव, रूप किंवा व्यक्तिमत्त्वाशी मर्यादित नसते. या जाणिवेत स्थिर राहणे म्हणजे आत्मस्वरूपाकडे परत जाणे. त्यांच्यामते खरी साधना म्हणजे बाह्य विधी, कर्मकांड किंवा गुंतागुंतीच्या साधनांपेक्षा स्वतःच्या अस्तित्वाच्या या मूलभूत जाणिवेचे सतत निरीक्षण करणे होय.

महाराज साक्षीभावावर विशेष भर देतात. विचार येतात, भावना बदलतात, आनंद आणि दुःख येतात-जात राहतात; परंतु या सर्व अनुभवांचे निरीक्षण करणारा जो साक्षी आहे, तो कधीही बदलत नाही. मनुष्याने स्वतःला विचारांशी किंवा भावनांशी एकरूप न करता त्या केवळ येणाऱ्या-जाणाऱ्या घटना म्हणून पाहण्याचा अभ्यास केला, तर मानसिक तणाव आणि भीती आपोआप कमी होऊ लागतात. मनावर आंधळा विश्वास ठेवण्याऐवजी त्याचे निरीक्षण करण्याची वृत्ती विकसित करणे ही त्यांच्या शिकवणीची महत्त्वाची दिशा आहे.

आजच्या युगातील स्पर्धा, उपभोगवाद आणि सततच्या अपेक्षांमुळे निर्माण होणारा तणावही त्यांच्या विचारांतून समजून घेता येतो. इच्छा पूर्ण झाली की नवीन इच्छा निर्माण होते आणि अपूर्ण राहिली तर दुःख निर्माण होते. त्यामुळे सुख बाह्य वस्तूंमध्ये नसून स्वतःच्या स्वरूपाच्या जाणिवेत आहे, असे ते सांगतात. मनुष्याने स्वतःच्या अंतरंगातील शांततेचा शोध घेतला तर बाह्य परिस्थिती कितीही बदलली तरी त्याचे मानसिक संतुलन ढळत नाही.

पर्यावरणीय आणि वैश्विक समस्यांकडे पाहण्याची दृष्टीही त्यांच्या अद्वैत तत्त्वज्ञानातून अधिक व्यापक बनते. जेव्हा मनुष्य स्वतःला संपूर्ण अस्तित्वापासून वेगळे मानतो, तेव्हा तो निसर्गाचे शोषण करतो, इतरांशी संघर्ष करतो आणि स्वार्थी वर्तन करतो. परंतु सर्व जीव आणि संपूर्ण विश्व एकाच चैतन्याचे प्रकटीकरण आहे, अशी अनुभूती आली तर करुणा, सहअस्तित्व आणि जबाबदारीची भावना नैसर्गिकरित्या विकसित होते. अशा दृष्टीकोनातून पर्यावरणाचे संरक्षण, सामाजिक न्याय आणि जागतिक शांतता यांना अधिक सखोल

आध्यात्मिक आधार मिळतो.

कृत्रिम बुद्धिमत्ता, स्वयंचलित यंत्रणा आणि आधुनिक तंत्रज्ञानामुळे भविष्यात अनेक क्षेत्रांत मोठे बदल होणार आहेत. तथापि, आत्मज्ञान, प्रेम, करुणा, विवेक, अंतर्मनातील शांतता आणि साक्षीभाव ही अशी मूल्ये आहेत जी कोणतेही यंत्र निर्माण करू शकत नाही. म्हणूनच भविष्यात अध्यात्मिक जागरूकतेचे महत्त्व कमी न होता अधिक वाढण्याची शक्यता आहे. विज्ञान मानवाला बाह्य विश्व समजावून सांगते, तर अध्यात्म त्याला स्वतःचे स्वरूप जाणून घेण्याची दिशा देते. या दोन्हींचा समतोलच नवयुगातील मानवासाठी आवश्यक आहे.

दैनंदिन जीवनात निसर्गदत्त महाराजांची शिकवण अत्यंत व्यावहारिक आहे. दररोज काही वेळ शांत बसून "मी आहे" या जाणिवेकडे लक्ष देणे, विचारांशी संघर्ष न करता त्यांचे निरीक्षण करणे, प्रत्येक कृती जागरूकतेने करणे आणि स्वतःसह इतरांशी करुणेने वागणे, यामुळे मानसिक स्थैर्य, विवेक आणि अंतर्मनातील शांती विकसित होऊ शकते. व्यक्तीमध्ये असा बदल घडला तर त्याचा परिणाम कुटुंबावर, समाजावर आणि अखेरीस संपूर्ण मानवजातीवर होतो.

शेवटी असे म्हणता येईल की नवयुगातील समस्या केवळ आर्थिक, सामाजिक किंवा तांत्रिक नाहीत; त्या मानवी चेतना, ओळख आणि जीवनदृष्टीशी निगडित आहेत. निसर्गदत्त महाराज यांची शिकवण बाह्यजगाचा त्याग करण्याची नव्हे, तर स्वतःच्या खऱ्या स्वरूपाची ओळख करून देण्याची आहे. साक्षीभावाने जीवन जगल्यास वैयक्तिक दुःख कमी होऊ शकते, सामाजिक संबंध अधिक सुदृढ होऊ शकतात आणि वैश्विक समस्यांकडे अधिक जबाबदार, करुणामय व समन्वयवादी दृष्टीने पाहण्याची प्रेरणा मिळू शकते. त्यामुळे त्यांच्या शिकवणीचे महत्त्व आधुनिक काळात पूर्वीपेक्षा अधिक वाढलेले दिसते...!

जय सद्गुरू.

२०२५च्या गुरुपौर्णिमा शुभदिनी "निसर्गवाणी" डिजिटल त्रैमासिकाचा शुभारंभ करण्यात आला. या २०२६च्या गुरुपौर्णिमेला त्रैमासिकाने दुस-या वर्षात यशस्वी पदार्पण केले आहे. पहिल्या वर्धापनदिनाचे औचित्य साधून हे विशेष सुंदर मुखपृष्ठ सद्गुरुभक्त श्री भरतभाई शिंपी, जलगाव यांनी तयार केले आहे.

श्री निसर्गदत्त समाधी
चॅरीटेबल ट्रस्ट

Nisargavaani

निसर्गवाणी ನಿಸರ್ಗವಾಣಿ निसर्गबानी

वर्ष २ रे अंक ५ वा जुलै - सप्टेंबर २०२६

अ नु क्र म णि का

निसर्गवाणी डिजिटल त्रैमासिक प्रथम वर्धापनदिन निमित्ताने ...

पॉल व्हर्विश आणि श्री निसर्गदत्त महाराज

सत्-चित्-आनंद

श्रीमद् भगवद्गीता आणि श्री निसर्गदत्त महाराज यांचे ‘आय ॲम दॅट’

निसर्गवाणी डिजिटल त्रैमासिक प्रथम वर्धापनदिन निमित्ताने ...

फेब्रुवारी २०२२मध्ये बाणगंगा, वाळकेश्वर मुंबई येथे श्री निसर्गदत्त समाधी मंदिर उभारले गेले आणि त्याच्या व्यवस्थापनेसाठी २०२४मध्ये समाधि चॅरीटेबल ट्रस्ट स्थापन झाला. ट्रस्ट निर्मितीनंतर त्याच्या माध्यमातून दोन प्रस्ताव डोळ्यासमोर होते. एक म्हणजे ट्रस्टची अधिकृत वेबसाईट तयार करणे. आणि ट्रस्टच्या माध्यमातून त्रैमासिक सुरु करणे. त्यामागे कारण होते ते म्हणजे हिंचगिरी संप्रदायाशी सलग्न काही अध्यात्म केंद्रांनी आपल्या सद्गुरूंची वचने, निरुपणे किंवा शिष्य मंडळीकडून अनुभवात्मक लिखाण इत्यादि साहित्य प्रसिद्ध करता यावे या हेतूने मासिक/त्रैमासिक/ विशेष अंक काढलेले आहेत. श्री निसर्गदत्त महाराज यांची शिकवण कित्येक वर्षापासून जगभरात पोहोचलेली आहे. संप्रदायाबाहेरील लाखो लोक आजही त्यांच्या शिकवणीचा अभ्यास करताहेत. पण त्यांची शिकवण, निंबर्गी सांप्रदायात होऊन गेलेल्या सर्व संतांची माहिती/ शिकवण इत्यादिसाठी कोणत्याही अध्यात्मकेंद्रातर्फे त्रैमासिक किंवा अर्धवार्षिक/वार्षिक मासिक काढले गेलेले नाही असे जाणवत होते.

अवाढव्य प्रिंटींग खर्च आणि वाचकापर्यंत दर तीन महिन्यांनी पाठविण्यासाठीच्या यंत्रणेचा अभाव आणि नियमित लागणारा कुरियर खर्च लक्षात घेता त्रैमासिक डिजिटल स्वरुपात असणे सोयीस्कर वाटले. त्यामुळे ट्रस्टच्या वेबसाईटवर अपलोड करून जगाच्या कानाकोप-यातील वाचकवर्गाकडे ते सहजपणे पोहचविता येईल आणि कोणत्याही वेळी, कुठेही, कोणालाही वाचण्यासाठी ते सहज उपलब्ध होईल. देशातील विविध भाषिक वाचकवर्गाचा विचार करून निसर्गवाणी चार महत्वाच्या भाषात म्हणजेच इंग्रजी, मराठी, हिंदी आणि कन्नड ठेवावे म्हणजे मासिक जास्तीत जास्त लोकांपुढे आणता येईल असा निर्णय घेतला गेला. अनेक ठिकाणी विखुरलेले

गुरुबंधू-भगिनी त्यासाठी आवश्यक ते लेखनसाहित्य डिजिटली पाठवू शकतात. नवीन पिढीतील युवाशक्तीच्या सहकार्याने आजच्या पिढीतून हे कार्य अधिक जोमाने पुढे जाऊ शकते. सांप्रदायिक माहिती अनेक नवीन लोकांपर्यंत नेणे शक्य होऊ शकते. अशा अनेक हेतूने प्रेरित होऊन 'निसर्गवाणी डिजिटल त्रैमासिक'ची कल्पना पुढे आली.

गुरुवार दिनांक १० जुलै २०२५ रोजी गुरुपौर्णिमा शुभमुहूर्तावर सायंकाळी ५ ते ६ वेळेत पहिल्या "निसर्गवाणी"डिजिटल त्रैमासिकाचा दृकश्राव्य पद्धतीने प्रकाशन सोहळा साजरा करण्यात आला.

कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून समर्थभक्त आदरणीय पूज्य श्री योगेशबुवा रामदासी, मा.कार्यवाह, समर्थ सेवा मंडळ, सज्जनगड आणि सद्गुरू निसर्गदत्त महाराज यांचे शिष्य सद्गुरू श्री सहजदत्त महाराज यांची दृक्श्राव्य माध्यमातून उपस्थिती लाभली होती. तत्वज्ञान विषयावर संशोधन करून डॉक्टरेट डिग्री मिळविलेल्या डॉ. संध्याताई जोशी याप्रसंगी प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित होत्या.



पहिल्या अंकाच्या संपादकीयामध्ये नमूद केल्याप्रमाणे श्री निसर्गदत्त महाराज यांचे शब्द म्हणजे उपनिषदकाळातील प्राचीन भारतीय ऋषींचे प्रतिध्वनी आहेत. श्री निसर्गदत्त साक्षात 'वेदांत केसरी' आहेत. त्यांच्या ज्ञानगर्जनेने जगभरातील अनेक मुमुक्षु, साधक यांच्या भ्रमरूप अज्ञानाचे पटल दूर होत आहेत. त्यांना त्यांच्या दिव्य स्वरूपाची जाणीव करून दिली जात आहे. 'निसर्गवाणी'द्वारे अमरत्वाचे हे अमृत जगभरातील सर्व जिज्ञासूना कायम उपलब्ध करून देण्याचा आमचा मानस आहे.

जगाला विश्वबंधुत्वाची शिकवण देणा-या आपल्या एकमेव भारतभूमीत अनादी काळापासून अनेक प्रसिध्द-प्रसिद्ध न पावलेले अवतारादिक रत्ने-माणके आहेत, अनेक थोर संत-साधुपुरुष होऊन गेले आहेत, आजही आहेत. भारतातील अशा सर्व ज्ञात आणि अज्ञात गुरुंच्या या प्राचीन आणि शाश्वत वेदांतिक शिकवण प्रदान करण्याचा "निसर्गवाणी" त्रैमासिक एक प्रामाणिक प्रयत्न आहे.

मासिकाच्या पहिल्या वर्षभरात अनेक लेखक-लेखिकांनी आपला अमुल्य वेळ आणि उत्कृष्ट लेख देऊन श्री निसर्गदत्त समाधि ट्रस्टला मोठे सहकार्य केले आहे. त्यांचा नामोल्लेख इथे करणे उचित ठरेल.

श्री निसर्गदत्त महाराजांच्या अनेक आठवणी त्यांच्या शिष्यमंडळीना पण माहित नव्हत्या, त्या दुर्मिळ आठवणी विदेशी जिज्ञासू इटलीचे अँटनिओ प्लाना यांनी या मासिकासाठी उपलब्ध करून दिल्या. दुसरे एक विदेशी जिज्ञासू लेखक आहेत लंडनला शिक्षणासाठी असणारे एल्कीनमेंगुसोग्लू. नागपूरचे श्री प्रमोद पारखी, बंगळुरूचे श्री विश्वनाथ शंकरन, चांदमाल ताराचंद बोरा महाविद्यालय, शिरूर,पुणे येथील निवृत्त प्रा. बाळकृष्ण लळीत. कोल्हापूरचे डॉ. सुधीर फडके, पुण्याच्या सौ.अनुराधा म्हात्रे, समर्थ गणपतराव महाराज कन्नुर यांचे शिष्य अनंत कुलकर्णी, मयूर यादव, सौ शामल यादव, ठाणे, समर्थ वांग्मयावर पी.एच.डी प्राप्त केलेल्या नवी मुंबई येथील डॉ.रसिका ताम्हनकर, मुंबईचे श्री साटम, डॉ. संध्या जोशी, रिझर्व बँकेचे वरिष्ठ अधिकारी डॉ. आशुतोष रारावीकर, श्री शान्तिदास उर्फ श्री बाबाजी सावंत, श्री गजानन नेत्रावली, सौ हेमलता कोलारकर.

प्रसिद्ध झालेल्या मागील प्रत्येक निसर्गवाणी त्रैमासिकाचे आकर्षक तसेच साजेसे मुखपृष्ठ जळगावचे सद्गुरुभक्त श्री भरतभाई शिंपी सेवाभाववृत्तीने अल्पावधीत तयार करून या कार्यात फार मोलाची मदत करतात. आणि शेवटी सर्वात महत्वाचे काम म्हणजे निसर्गवाणी अंकाची स्वेच्छेने आकर्षक मांडणी आणि अंतर्गत सजावट ही जबाबदारी पेलणारे आणि महाराजाच्या साहित्यावर जीवापाड प्रेम करणारे झेन

प्रकाशन मुंबई संस्थेचे सर्वेसर्वा आदरणीय श्री योगेशजी शर्मा.

ज्यांच्या पाठबळामुळे हे अवघड शिवधनुष्य उचलले गेले आहे त्या निसर्गवाणीच्या संपादक मंडळाचे या निमित्ताने अभिनंदन आणि मन:पूर्वक धन्यवाद.

भाषांतर कामी मदत करणारे श्री रामजी वर्मा, श्री दिपक वैकुंठे यासारख्या सर्व सुहृदांचे मनापासून आभार. त्यांच्याकडून असेच सहकार्य निसर्गवाणीच्या यापुढील वाटचालीसाठी लाभेल अशी श्री निसर्गदत्त समाधी चॅरीटेबल ट्रस्ट, मुंबईच्या वतीने अपेक्षा व्यक्त करते.

– सौ. अनघा धोत्रे-कामत
अध्यक्षा
श्री निसर्गदत्त समाधी चॅरीटेबल ट्रस्ट, मुंबई
दि.१० जुलै २०२६

अनित्याच्या संसर्गाने मायेतील व्यवहार योग्य आहे असे वाटत असते. प्रवृत्तीमार्गाला अनुसरून तुमच्या धर्माचे नियम तर तुम्ही पाळताच, त्यापासून प्राप्त होणारे पुण्य भोगून संपवावे लागते. तुमच्या धर्मात राहून या स्वरूपी रहाण्याच्या स्वधर्माचे आचरण करा.

– सद्गुरू श्री भाऊसाहेब महाराज उमदीकर

पॉल व्हर्विश आणि श्री निसर्गदत्त महाराज

पाश्चात्त्य बुद्धिवादी विचारसरणीत वाढलेल्या एका जिज्ञासूची, विसाव्या शतकाच्या उत्तरार्धातील या गोंधळलेल्या काळात, भारतातील अद्वैत वेदांताच्या शुद्ध परंपरेचे प्रतिनिधित्व करणाऱ्या एका सद्गुरूंशी भेट झाली तर काय घडते? फ्रेंच अभिनेते व पत्रकार पॉल व्हर्विश, समकालीन युगातील महान ज्ञानी पुरुषांपैकी एक असलेल्या श्री निसर्गदत्त महाराज यांच्याशी झालेल्या आपल्या अविस्मरणीय प्रत्यक्ष भेटीचा अनुभव येथे उलगडत आहेत...

इंग्लंडमध्ये डग्लस हार्डिंग यांच्या घरी माझ्या एका मुक्कामादरम्यान मी प्रथमच श्री निसर्गदत्त महाराज यांचे नाव ऐकले. मला त्यांच्याविषयी काहीच माहिती नसल्याचे पाहून आश्चर्यचकित झालेल्या डग्लस यांनी *'आय ॲम दॅट'* हे पुस्तक माझ्या हातात ठेवले. हे पुस्तक वाचून मी अत्यंत प्रभावित झालो. त्यातील संवादांचा साधेपणा आणि गहनता यांमुळे माझ्या अंतर्मनात एक विलक्षण स्पंदन जागृत झाले आणि त्याचवेळी एक असामान्य शांतताही अनुभवास आली. फ्रान्सला परतल्यानंतर मी या पुस्तकाची प्रत मिळवली आणि त्याचे दररोज वाचन करू लागलो. अनेकदा एकही पान पुढे न वाचता मी बराच वेळ त्याच ठिकाणी थांबत असे; ते जणू माझ्यासाठी आत्मिक पोषणच होते. सहा महिन्यांनंतर, माझ्या दैनंदिन जीवनात नकळतपणे एक महत्त्वाचे स्थान प्राप्त केलेल्या त्या महापुरुषाला भेटण्याचा मी निर्णय घेतला. त्यांना घशाचा कर्करोग झाला होता आणि त्यांची प्रकृती दिवसेंदिवस खालावत चालली होती. त्यामुळे त्यांची प्रत्यक्ष भेट घेण्याचे भाग्य मला लाभेल की नाही, याबद्दल मी साशंक होतो.

[...] इतक्या महत्त्वाच्या भेटीसाठी वेळेवर पोहोचू न शकल्याची खंत आणि उत्सुकता या दोन्ही भावनांनी भरलेला मी एका कमी उंचीच्या छताच्या खोलीत प्रवेश केला. तेथे सुमारे पंधरा जण गालिच्यावर बसून महाराजांचे बोलणे एकाग्रतेने ऐकत होते. महाराजांची देहयष्टी लहान व कृश होती. त्यांचा वर्णही फिकट भासत होता. त्यांच्या हातवाऱ्यांत चैतन्य आणि उत्स्फूर्तता होती. मात्र त्यांच्या व्यक्तिमत्त्वात एक अद्भुत भव्यता आणि विलक्षण आकर्षण होते. आजही ते सगळं अगदी जशाच्या तसं, स्पष्टपणे आठवतंय. परंतु त्या वेळी मात्र मला त्यांच्या डोळ्यांशिवाय कशाचंच भान नव्हतं. त्यांची ती भिंतींही भेदून जाणारी एक अनाकलनीय, अविस्मरणीय नजर. जेव्हा ती नजर माझ्यावर स्थिरावली, तेव्हा दैनंदिन जगण्यातल्या साऱ्या सावल्या जणू विरघळून गेल्या. मी पूर्णपणे निशस्त्र, उघडा पडलो होतो. कोणासाठीही अकल्पनीय असा एक अनुभव!

विरोधाभासी भावनांनी अस्वस्थ होऊन मी नुकताच खाली बसलो होतो; तेवढ्यात अनुवादकाचे बोलणे संपले. महाराजांनी माझ्याकडे बोट दाखवले आणि ते विचारू लागले: मी कुठून आलो आहे? मी कशासाठी आलो आहे? आणि मी स्वतःला कोण समजतो?

मी तिथे प्रश्न विचारण्यासाठी आलो होतो, पण महाराजांनीच उलट प्रश्न विचारून मी मनात तयार केलेली प्रश्नांची सगळी रूपरेषा क्षणार्धात बाजूला सारली. त्या क्षणाच्या तीव्रतेने भारावून जाऊन, मी माझ्या अंतःकरणापासून उत्तर दिले. या संवादाचा फक्त थोडाच भाग आज माझ्या स्मरणात आहे, पण त्या संभाषणाचा शेवट मात्र माझ्या स्मरणात कायमचा कोरला गेला.

जेव्हा महाराजांनी मला विचारलं, की मी त्यांचे हे बोचरे शब्द यापूर्वी कधी ऐकले आहेत का; तेव्हा मी म्हणालो, 'अर्थातच, रोजच!' त्यावर ते म्हणाले, 'खूप छान, मग आपण एकत्र काम करू शकू. पण, मी वापरलेले हे सगळे शब्द—जे तू समजून घेण्याचा प्रयत्न करतोयस— त्यांचा तुझ्या खऱ्या स्वरूपाशी काहीही संबंध नाही. तुझं मूळ स्वरूप (खरे अस्तित्व) त्या सर्व संकल्पना जिथे उदयाला येतात त्याहीपेक्षा अधिक जवळ आहे.

माझी सद्गुरूंशी झालेली भेट केवळ त्या एका संवादापुरतीच मर्यादित राहिली असती, तरीही जे सर्वात महत्त्वाचे आणि आवश्यक (सारभूत) होते, ते मला आधीच मिळाले होते.

महाराजांच्या उत्तरांमधील उत्स्फूर्तता विलक्षण होती. प्रश्नांचे मराठीत भाषांतर

होताच त्यांच्या उत्तरांचा ओघ तत्क्षणी सुरू होत असे; इतकेच नव्हे, तर अनेकदा ते भाषांतरकाराचे वाक्य पूर्ण होण्यापूर्वीच त्यांना मध्येच थांबवत पुढे बोलत. या थक्क करणाऱ्या उत्स्फूर्ततेतून आम्हा सर्वांना स्पष्टपणे जाणवत असे की त्यांचे शब्द बौद्धिक विचारमंथनाच्या पातळीवरून नव्हे, तर एका वेगळ्याच स्रोतामधून उदयाला येत होते. गरीब कुटुंबात वाढलेला, पूर्वी शेती केलेला आणि औपचारिक शिक्षणाचा अभाव असलेला ("मी जवळजवळ निरक्षरच आहे," असे ते म्हणत) – हा साधासुधा मनुष्य विविध संस्कृती आणि भिन्न स्वभावांच्या अभ्यागतांशी अत्यंत सूक्ष्म आणि गहन तात्त्विक विषयांवर सहजपणे संवाद साधत असे.

[...] आमच्या संवादांमध्ये अनेकदा हास्याचे फवारे उडत असत. महाराजांची विनोदबुद्धी अतिशय तीक्ष्ण होती. एखादा शब्द जरा उघड किंवा परखड वाटेल या संकोचामुळे भाषांतरकाराने त्याऐवजी सौम्य शब्दप्रयोग केला, तर महाराज त्यालाही सोडत नसत. महाराजांना झालेला कर्करोग हा त्यांच्यासाठी कधीही निषिद्ध विषय नव्हता. आपल्या शरीराची होत चाललेली झीज आणि शारीरिक वेदना यांविषयी ते इतक्या अलिप्ततेने बोलत, जणू काही हवामानावर चर्चा सुरू आहे (ते कोणतेही औषध घेत नसत). या माणसाच्या चरणांशी मला जे अनुभवायला मिळाले, त्याचे वर्णन करणे अशक्य आहे. फार-फार तर मी एवढंच सांगू शकेन, की तिथे माझ्या मनातील सर्व भीती नाहीशी झाली होती, एक अथांग आंतरिक स्वातंत्र्य आणि केवळ प्रेमाचीच एक अवस्था मी अनुभवत होतो.

"तू अजूनही देह-बुद्धीच्याच पातळीवर अडकला आहेस; अशा पातळीवर, जिला केवळ बाह्य रूपे आणि आकारच साठवून ठेवायचे असतात. त्यांच्याशी संघर्ष करत बसू नकोस, तर थेट त्यांच्या मूळ स्रोताकडे (उगमाकडे) वळ!"

महाराज माझ्या सर्व प्रश्नांची उत्तरे देत असत; परंतु त्यांचा भर नेहमी एका गोष्टीवरच असे—त्या अटळ 'असणेपणा'वर, जो अनुभवता येणाऱ्या प्रत्येक गोष्टीचा मूळ पाया आहे. एके सकाळी त्यांनी मला विचारले, "तू इथे बऱ्याच दिवसांपासून येतो आहेस. मला सांग, अशी कोणती गोष्ट आहे जी तू साठवून (पकडून) ठेवली नाहीस?" या अत्यंत सूक्ष्म प्रश्नातून महाराज पुन्हा एकदा माझ्या मनाच्या त्या सतत कार्यरत राहणाऱ्या स्तराकडे बोट दाखवत होते, ज्याच्या पलीकडे जाणे मला आवश्यक होते. या प्रश्नाने, त्याच्या साधेपणामुळेच, मला अंतर्बाह्य हादरवून सोडले.

लवकरच असे होऊ लागले की मनात प्रश्न उभे राहिले तरी त्यांतील पोकळपणा मला स्पष्ट दिसू लागला. ते एका निरर्थक यंत्रणेची निर्मिती असल्याचे जाणवत

होते, जिचे फिरणारे दाते (चाकी) मला स्पष्ट दिसत होते. मी महाराजांना याविषयी सांगितले; परंतु त्यांनी याकडे त्या दृष्टीने पाहिले नाही. मला आणखी खोलवर जावे लागणार होते—अंतर्विरोध, सूक्ष्मातिसूक्ष्म शंका आणि उरलेल्या सावल्या शोधून त्यांना प्रकाशात आणावे लागणार होते. मी त्यासाठी आटोकाट प्रयत्न करू लागलो; पण महाराज अधिकाधिक कठोर (आग्रही) होत गेले. “हे सर्व आधीच सांगितले गेले आहे; म्हणजे तुला अजून काहीच समजलेले नाही! हे प्रश्न अगदी प्राथमिक आहेत. देहबुद्धीचा त्याग कर. सर्व काही ‘मी आहे’ या जाणिवेपासून सुरू होते. ती एक उपस्थिती आहे, स्मृती नव्हे; तिला ना आकार आहे ना गंध. तिथेच स्थिर हो आणि मग तुझा प्रश्न विचार!”

महाराजांना ही अंतःकरणशुद्धीची प्रक्रिया पुढे न्यायची होती; पण माझ्याकडे विचारण्यासाठी प्रश्नच उरले नव्हते. त्यामुळे ते माझी थट्टा करू लागले. हजारो किलोमीटरचा प्रवास करून, त्या उकाड्याच्या आणि कोंदट खोलीत जमिनीवर बसूनही, ज्या हेतूने आलो होतो तो एकही प्रश्न विचारता येत नाही—यापेक्षा अधिक हास्यास्पद काय असू शकते? शेवटी, एके संध्याकाळी त्यांनी थेट इशाराच दिला: “उद्या अगदी नाट्यगृहासारखे होईल. तुझा प्रश्न हेच तुझे प्रवेशपत्र असेल. प्रश्न नसेल तर चर्चा नाही, आणि तुला बाहेरच थांबावे लागेल!” ती रात्र माझ्यासाठी अत्यंत अस्वस्थ करणारी ठरली. दुसऱ्या दिवशी सकाळी मी महाराजांच्या घरी पोहोचलो, तेव्हाही माझ्या मनात एकही प्रश्न निर्माण झाला नव्हता. महाराजांनी विचारताच मी निरागसपणे उत्तर दिले, “माझ्यासाठी सर्वाधिक उपयुक्त ठरेल असा प्रश्न कोणता?” हे ऐकताच महाराज मनापासून हसले आणि कोणतीही अट न घालता मला तिथे बसण्याची परवानगी दिली.

महाराज अत्यंत ठामपणे म्हणत: “माझे शब्द तू पूर्णपणे आत्मसात केलेस, तर ते प्रथम तुझ्या सर्व संकल्पना विरघळवून टाकतील आणि शेवटी स्वतःही नाहीसे होतील. अज्ञानाचा काटा पायात रुतल्यामुळे तू लंगडत चालतो आहेस. तो काटा काढण्यासाठी मी तुला एक सुई देतो. पण काटा काढून झाल्यावरही जर तू ती सुई जपून ठेवलीस, तर त्याचा तुला काय उपयोग?” किंवा ते असेही म्हणत: “माझे शब्द साबणासारखे आहेत. ते तुझ्या आत्म्याला डागाळणारे ज्ञानाचे थर धुऊन काढण्यासाठी मदत करतात. एकदा का ते थर विरघळले, की देवासाठी, स्वतःला स्वच्छ धुऊन टाक! जर तू सतत अंगाला साबणच चोळत राहिलास, तर पूर्वीपेक्षाही अधिक मळकट होशील!”

नोव्हेंबरच्या मध्यावर महाराजांनी मला परत जाण्यास सांगितले. माझ्या क्षमतेनुसार

जे काही आत्मसात करणे शक्य होते, ते मी केले होते; आता घरी परतण्याची वेळ आली होती. गेल्या काही दिवसांपासून ते इतर अभ्यागतांनाही निरोप देत होते. त्यांनी प्रचंड अशक्तपणा जाणवत असल्याची तक्रार केली होती, तरीही काही प्रश्न अजूनही त्यांच्याकडून अत्यंत थक्क करणारी, समृद्ध आणि सुस्पष्ट उत्तरे बाहेर काढत होते. ते म्हणाले, “मी आता या व्यक्त जगाशी केवळ जाणीवेच्या एका अगदी बारीक, पुसटशा किरणानेच जोडला गेलो आहे”. आणि पुढे सावध करत म्हणाले, “आता ही उत्तरे अधिक सामर्थ्यवान झाली आहेत. जपून राहा... माझे शब्द तुझ्यामधील सर्व काही विरघळवून टाकतील; काहीही शिल्लक राहणार नाही!”

त्यानंतर मी फ्रान्सला परतलो. महाराजांचे शब्दच माझ्यासाठी जणू जीवनाधार बनले होते. ते मला म्हणाले होते, “मी जे काही सांगितले आहे ते तुला पूर्णपणे समजले आहे, याची मला खात्री आहे. आता फक्त एकच अडथळा उरला आहे—तुझी देहाशी असलेली एकात्मता (देहबुद्धी) आणि एक दिवस तू मरणार आहेस ही तुझी ठाम समजूत ! आपल्या शरीरावर आणि भौतिक गोष्टींवरील प्रेम थोडे कमी कर. तू प्रत्यक्षात जे काही आहेस त्याला प्रेमाची गरज नाही; कारण ते स्वतःच प्रेमस्वरूप आहेस!”

यानंतर अवघ्या दहा महिन्यांनी, ८ सप्टेंबर १९८१ रोजी महाराजांचे महानिर्वाण झाले. या सर्व आठवणींना उजाळा देऊन आणि इतके शब्द लिहिल्यानंतर, शेवटी महाराजांचे एक वचन उद्धृत करावेसे वाटते. ते सर्व काही योग्य ठिकाणी नेऊन ठेवते: “हे शब्द वारंवार ऐकण्याची अत्यंत तीव्र गरज असते. पण त्यांचा संग्रह करू नका, त्यांना साठवून ठेवू नका. त्यांच्या परिणामाला स्वतःमध्ये उतरू द्या आणि मग त्यांना जाऊ द्या.”

– अनुवाद: अँटोनिओ प्लाना

(मूळ स्रोत अज्ञात. हा अनुवाद स्पेनमध्ये प्रकाशित झालेल्या *Tercer Milenio* या नियतकालिकाच्या तिसऱ्या अंकावर आधारित आहे. हे फ्रान्समध्ये सुमारे १९८५ च्या सुमारास प्रकाशित झालेल्या *Troisième Millénaire* या फ्रेंच नियतकालिकातील लेखाचे रूपांतर असण्याची शक्यता आहे.)

सत्-चित्-आनंद

'आपले शास्त्र आणि संत सांगतात की आपले स्वरूप म्हणजे सत्-चित्-आनंद— म्हणजेच अस्तित्व – चैतन्य – आनंद. या शब्दांचा नेमका अर्थ काय आहे? ते केवळ तत्त्वज्ञानातील शब्द आहेत की आपल्या रोजच्या अनुभवाचाही भाग आहेत? हे शब्द नेमके काय दर्शवितात, हे आपण सोप्या भाषेत सांगू शकाल का?'जेव्हा त्यांनी 'द माउंटन पाथ' मध्ये प्रकाशित झालेले निसर्गदत्त महाराजांबरोबरचे माझे अनुभव वाचले, तेव्हा त्या अत्यंत व्यथित झाल्या. पुढील भेटीत त्यांनी मला अरुणाचल सोडून मुंबईला जाऊन दुसऱ्या गुरूंच्या सहवासात वेळ घालवल्याबद्दल फैलावर घेतले, त्यांनी मला विचारले, "श्रीभगवानांच्या शिकवणीत असे काय कमी आहे, की तुला त्या दुसऱ्या गुरूंची मदत घ्यावी लागली?"

"होय, हे अगदी सोपे आहे. आधी 'सत्' म्हणजे अस्तित्व याचा विचार करूया.

सुरुवातीला काही सोपे प्रश्न विचारूया. तुम्ही जिवंत आहात का?"

'अर्थातच! होय!'

"तुम्ही जिवंत आहात याबद्दल तुम्हाला पूर्ण खात्री आहे का, की मनात काही शंका आहे? सकाळी जाग आली की, 'मी जिवंत आहे की नाही, हे कोणाला तरी विचारून पाहू,' असा विचार तुम्ही करता का?"

'मला जिवंत असल्याबद्दल मुळीच शंका नाही.'

"तुम्ही आहात का?"

'होय.'

"म्हणजे तुम्ही जिवंत आहात, याचाच अर्थ तुम्ही आहात. हाच 'सत्'—म्हणजे अस्तित्व.

हे स्वयंस्फूर्त आहे. त्यासाठी आपल्याला काहीही करावे लागत नाही. आता पुढील

भागाकडे वळूया—'चित्' म्हणजे चैतन्य.

तुम्ही इथे बसला आहात. तुमच्या आजूबाजूच्या गोष्टी तुम्हाला कळतात का?"

'होय.'

"त्या गोष्टी तुम्हाला कशामुळे कळतात? चैतन्यामुळे, म्हणजेच जाणीवेमुळे नाही का?z'

'होय.'

'हा कळतेपणा म्हणजेच 'चित्'—म्हणजे चैतन्य किंवा जाणीव. ही जाणीवही स्वयंस्फूर्त आहे. त्यासाठीही आपल्याला काहीही करावे लागत नाही. 'सत्' (अस्तित्व) आणि 'चित्' (चैतन्य) हे वेगळे नाहीत. ते एकाच गोष्टीचे दोन पैलू आहेत.

तुम्ही असे म्हणू शकत नाही की, 'मी आहे, पण मला जाणीव नाही.' किंवा 'मला जाणीव आहे, पण मी नाही.'

तुम्ही आहात, म्हणजे जाणीव आहे. आणि जाणीव आहे, म्हणजे तुम्ही आहात. हे दोन्ही नेहमी एकत्रच असतात.

आता असा प्रश्न पडू शकतो की गाढ झोपेत तर आपल्याला कशाचीच जाणीव नसते.

जागेपणी आपण आहोत आणि आपल्याला आपल्या आजूबाजूच्या जगाची—तसेच आपल्या देहाची आणि मनाचीही—इंद्रियांच्या माध्यमातून जाणीव असते. स्वप्नातही आपण जाणीवेतच असतो. फक्त त्या वेळी मन आणि स्मृती यांच्या माध्यमातून स्वप्नातील जगाची जाणीव होत असते.

गाढ झोपेत देह आणि मन विश्रांती घेतात. त्यामुळे व्यवहाराच्या दृष्टीने इंद्रियांचे कार्य थांबलेले असते आणि आपल्याला असे वाटते की जाणीव नाही. तरीसुद्धा त्या अवस्थेत आपण आहोत, जिवंत आहोत, हा अनुभव नाकारता येत नाही. गाढ झोपेतून जागे झाल्यावर आपल्याला ताजेतवाने वाटते. 'मी त्या काळात नव्हतो,' असे कधीच वाटत नाही.

आधी सांगितल्याप्रमाणे, 'सत्' (अस्तित्व) आणि 'चित्' (चैतन्य) हे कधीही एकमेकांपासून वेगळे नसतात. म्हणूनच गाढ झोपेत अस्तित्व होते, याचाच अर्थ त्या ठिकाणी चैतन्यही होते.

आता आपल्या स्वरूपाच्या तिसऱ्या पैलूकडे वळूया—तो म्हणजे 'आनंद'.

आनंद म्हणजे सुख नव्हे. सुख ही देह-मनाशी संबंधित भावना आहे. तिच्या विरुद्ध दुःख ही भावना आहे.मला एखादी गोष्ट हवी असते आणि ती मिळाली की

मला सुख वाटते. तीच गोष्ट मिळाली नाही तर दुःख वाटते. सुख आणि दुःख या दोन्ही मनाशी संबंधित अवस्था आहेत.

एक गोष्ट नीट लक्षात घ्या. सुख आणि दुःख या दोन्हींचे मूळ आपल्या अपूर्णतेच्या भावनेत आहे. मला वाटते, 'माझ्यात काहीतरी कमी आहे; मी अपूर्ण आहे.' म्हणून दुःख वाटते. आणि जी गोष्ट मला हवी आहे ती मिळाली, की मी सुखी होईन असे वाटते. ती मिळाली, की काही काळ सुख वाटते. आनंद ही कोणतीही भावना नाही. तो कारणरहित आहे. तो कोणत्याही बाह्य गोष्टीवर अवलंबून नसतो.

आपण पाहिले की आपले स्वरूप म्हणजे चैतन्य किंवा जाणीव. हे चैतन्य आकाशाप्रमाणे निर्मळ, अनंत आणि व्यापक आहे. आकाश अनंत आहे. संपूर्ण विश्व त्यात सामावलेले आहे, तरी त्याला कशाचाही स्पर्श होत नाही. ते स्वतःमध्येच पूर्ण आहे. त्याचप्रमाणे आपले स्वरूप असलेले चैतन्यही निर्मळ, अनंत आणि पूर्ण आहे. या पूर्णत्वाच्या जाणिवेलाच 'आनंद' म्हणतात.

गाढ झोपेत देह, मन आणि जग यांचा भास नसतो. त्या अवस्थेत आपण या आनंदाचा स्पर्श करतो. म्हणूनच प्रत्येकाला गाढ, शांत झोप हवीशी वाटते. कारण त्या अवस्थेत आपल्या स्वरूपातील पूर्णत्वाचा स्पर्श होतो. हे पूर्णत्वही स्वयंस्फूर्त आहे. त्यासाठी आपल्याला काहीही करावे लागत नाही.

जय गुरू!

– गजोबा

देहभाव विसरणे म्हणजे विदेह ! नामस्मरण करून देहभावाचा विसर पडलेली जी अवस्था असते, देहभाव नाहीसा झालेली जी स्थिती असते त्याला विदेह-स्थिती म्हणावी'.

– सद्गुरू श्री अंबुराव महाराज

श्रीमद् भगवद्गीता आणि श्री निसर्गदत्त महाराज यांचे 'आय ॲम दॅट'

काही वर्षांपूर्वी आचार्य विनोबाजी भावे यांचे 'गीता प्रवचने' नावाचे पुस्तक मला वाचायला मिळाले होते. ते मी पूर्ण शांतपणे वाचले कारण मला गीता निदान एकदा तरी वाचायची इच्छा होती. शिवाय हे पुस्तक एक तर मराठीत होते आणि दुसरे म्हणजे आमच्या घरी भगवद्गीतेची एक प्रत होती, पण ती हिंदीत असल्याने थोडीशी चाळून वाचण्याचा थोडा फार प्रयत्न मी केला होता. विनोबाजींच्या पुस्तकामुळे मात्र मला भगवद्गीतेची थोडी तोंडओळख झाली. पण भगवद्गीता वाचन आणि आकलन तेवढ्यापुरतेच मर्यादित राहिले.

निसर्गदत्त महाराजांची निसर्गदत्ताश्रमात श्री दासबोध, एकनाथी भागवत किंवा सदाचार यासारख्या ग्रंथातील ओव्यांवर निरुपणे होत असत. भगवद्गीता आणि कृष्ण-अर्जुन यांचा ज्ञानयोग याचा महाराज अधूनमधून त्यात उल्लेख करत. ऐकता ऐकता जेवढे कागदावर उतरून घेणे शक्य तेवढे लिहून घेण्याचा मी प्रयत्न करी.

महाराज श्रीकृष्ण आणि गीता यांचे महत्व विशद करताना म्हणत :

'गीतेमध्ये काय सांगितले आहे?..गीता वाचणारा शुद्धब्रह्म आहे एवढेच सांगितले आहे. भगवद्गीतेचा अभ्यास मनोभावे कराल तर तुम्हाला हे स्पष्ट दिसेल. दूध कोणाकरिता निर्माण होते?..वत्सासाठी! पण वत्साला मारतात काठी आणि ते दूध आपण पितात. तसे, भगवंताने उद्धवाला सांगितलेले ज्ञान आज मानवाला उपकारक झाले आहे'.

पण महाराजांकडून गीता महात्म्य ऐकले तरी भगवद्गीता किमान एकदा तरी पूर्ण वाचावी किंवा जाणत्याकडून समजून घ्यावी हे काही ना काही कारणाने शक्य होत नव्हते.

१९ मार्च २०२६ या दिवशी गुढीपाडवा होता. योगायोगाने पाडव्याच्या शुभमुहूर्तावर ठाण्यातील एक व्यासंगी श्री प्रभात गोपाळ जोशी यांनी लिहिलेले 'मला उमजलेली भगवद्गीता' हे पुस्तक सकाळी सकाळीच माझ्या हातात पडले. गीता धर्म मंडळ पुणे, आणि टिळक विद्यापीठाच्या 'भगवद्गीता रहस्य' या विषयावरील पदवी-परीक्षेसाठी त्यांनी गीतेचा सखोल अभ्यास केला आहे. त्यातूनच त्यांना उमजलेली भगवद्गीता त्यांनी लिहिली. हे पुस्तक मी अथपासून इतिपर्यंत वाचून काढले. शेवटच्या पानावर मुख्य संदर्भग्रंथ सूचीतील नावे नजरेखाली घालत होतो. ती नावे वाचता वाचता माझी नजर पडली ती **'आय ॲम दॅट – श्री निसर्गदत्त महाराज'** या नावावर आणि मला मनापासून खूप आनंद झाला. महाराजांच्या प्रवचनातील वरील वचनांची आठवण जागी झाली. 'निसर्गवाणी'साठी काहीतरी नवीन विषय डोक्यात येत असतानाच वरील विषयावर आपण काही लिहायला हवे असे मला वाटू लागले, त्या निमित्ताने पुन्हा एकदा संपूर्ण गीता नजरेखालूनही घातली जाईल असे मनात आले. आणि त्यातूनच हे थोडेसे लिखाण घडते आहे.

सगळ्या अवतारात श्रीकृष्ण हा पूर्णपरब्रह्मस्वरूप होता असे महाराज वारंवार सांगायचे.

> *"हजार वर्षांनी एक केस गळतो इतके आयुष्य असणारे इच्छा-मरणी कृष्णाच्या दर्शनाला आले, याचा अर्थ काय? कृष्ण तर कालचा! पण हजारो वर्षांचे महासामर्थ्यशाली जपी-तपी कृष्णाला पूज्य मानत. म्हणजे, कृष्णाकडे काय ज्ञान असेल!"*

श्रीकृष्ण आणि भगवद्गीतेचे महात्म्य श्री निसर्गदत्त महाराज त्यांच्या अनोख्या शैलीत वर्णन करताना म्हणत:

> *श्रीकृष्ण म्हणजे गुणक्षोभाचे आपेआप निर्माण झालेले चित्रकार चित्र! आपली निर्मिती कशी झाली हे सांगणारा कृष्णासारखा विरुळाच!*

रणांगणावर अर्जुनाला कर्मयोग, ज्ञानयोग, भक्तियोग, ध्यानयोग, सांख्ययोग याचे ज्ञान सांगत त्याला विश्वरूपदर्शन देऊन सगळे काही मीच आहे आणि माझ्यात सामावले आहे सांगणारा श्रीकृष्ण कसा आणि कोण आहे? याचे वर्णन महाराज करतात: ***'गुणक्षोभाचे आपेआप निर्माण झालेले चित्रकार चित्र!'***

यातील पहिला शब्दप्रयोग वापरला आहे तो म्हणजे **गुणक्षोभ**. दोन शब्दांची संधि...'गुण' आणि 'क्षोभ' मिळून हा शब्द महाराजांच्या वाणीतून बाहेर पडला.

प्रारंभीच या दोन शब्दांचा थोडा विस्तार करत महाराजांच्या **'आय ॲम दॅट'** कडे वळण्याचा प्रयत्न करतो.

साखरेचा गुण गोडपणा, चिंचेचा गुण आंबटपणा, मिठाचा गुण खारटपणा वगैरे वगैरे ..म्हणजे त्या पदार्थात जो सत्वयुक्त रस आहे त्या रसाचा गुणधर्म...त्याचा गुण, त्याचा स्वाद. प्राणीमात्र जे काही खातात त्याचे सत्व बनते. सत्वरस बनतो. त्या सत्वरसाचा गुण, गुणधर्म किंवा स्वाद म्हणजे आपण असल्याचे ज्ञान किंवा आपण असल्याचे 'कळतेपण'..आपण आहे असे कळते ते किंवा आपण आहे, आपण असल्याची 'जाणीव' जन्मकाळी निर्माण होते. त्याला चैतन्य असेही म्हणतात, तर काही त्याला चेतना म्हणतात, काही अंतरीचा दिवा म्हणतात, काही अंतरंगातील तेवणारी ज्योतही म्हणतात. पण सत्वाधीष्ठीत सर्व प्राणीमात्रात हा एकच जाणीव गुण आहे...जाणीवरूपाने! या गुणाच्या अस्तित्वासाठी अन्न, पाणी आणि प्राण या तिन्ही गोष्टींची आवश्यकता असते. अन्नाची कमतरता किंवा प्राणाची कमतरता किंवा पाण्याची कमतरता दीर्घकाळ राहिली तर गुण विसर्जन होतो. या गुणामुळेच सर्व काही भासते आहे. त्याच्या प्रकाशाने जगाचे दर्शन होते आहे. गुण विसर्जित झाला तर शरीर काष्ठवत आहे.

सर्वेन्द्रियगुणाभासं सर्वेन्द्रियविवर्जितम्।
असक्तं सर्वभृच्चैव निर्गुणं गुणभोक्तृ च।।

(भगवद्गीता अ.१३/१४)

'आय ॲम दॅट': मी कोण? हा साधकांचा प्रश्न आणि त्याचे महाराजांनी विस्तृतपणे दिलेले उत्तर **'तेच मी आहे'.** म्हणजे मुळातला मुद्दा मी कोण? ही हकीगत सांगताना महाराज गुणउत्पतीपासून सुरुवात करतात. आपण बोलताना, चालताना, खाताना, पिताना आपला उल्लेख 'मी' असा करतो आपण असल्याची जाणीव निर्माण झाली आहे. म्हणजे आपण असल्याचे ज्ञान निर्माण झाले आहे. ते ज्ञान सत्वाधिष्ठीत आहे. सत्वामध्ये तो गुण निर्माण झाला आहे.

हे सगळे कसे निर्माण झाले?काय झाले? इंग्रजीत त्याला आपण **आय ॲम. आय ॲम** ..करू लागलो. मराठीत मी ..मी..म्हणू लागलो.

हे स्पष्ट करताना निसर्गदत्त महाराज म्हणतात:

खाल्लेल्या पदार्थाचा जो गुण बनतो त्याला सत्व नांव आहे. जिथे सत्वगुण आहे तिथे तुम्ही असल्याची आठवण आहे. फुलात जसा सुगंध आहे तसा

देहात आपण असल्याचे ज्ञान म्हणून सत्वाचा गुण आहे. त्या सत्वातले सत्व.. शुद्धसत्व. त्या शुद्धसत्वाचा गुण..प्राण्याला आपण आहे असे जाणवते, जग आहे असे जाणवते. खाद्याच्या अन्नरसामध्ये तुम्ही असल्याचा स्वाद आहे हा सत्वगुण आहे.

गुण म्हणजे आता ऐकते ते ज्ञान. मूळ गुण सत्वातुनच जाणवतो. तो सुध्दा 'आपण आहे' अशा जाणीवेने जाणवतो. अन्नाविणे गुण नाही. त्या सत्वामध्येच तुम्ही असल्याचे ज्ञान 'स्व'त्व म्हणून टिकून आहे. शुद्धसत्वाचा गुण..'असणे' जाणवते. ज्ञानाच्या प्रकाशात काया दिसते आणि जगही दिसते. गुण म्हणजे अवांच्छित जाणवण..आपणा भासविते आपण. तो गुण प्रकाशला तेव्हा तुम्हाला 'आहे' असे वाटले.

गुण म्हणजे आपणाला आपण जाणवत नव्हतो ते जाणवणे. या जाणवण्यामुळे आपणाला आपल्या अस्तित्वाची हमी मिळाली. गुण कोणाला म्हणायचे?.. तर जन्म म्हणून जे ज्ञान निर्माण झाले आहे ते! तू पूर्वीचाच आहेस. तू असल्याचे ज्ञान या गुणाचाच सर्व खेळ आहे. गुण म्हणजेच ज्ञान. तो सत्वाचा प्रकाश आहे. शुद्धसत्वाचा आत्मगुण आहे. साखरेचा आत्मगुण जसा गोडी, तसा शुध्दसत्वाचा आत्मगुण ज्ञान. अर्थ काय त्याचा?..आपण असल्याची हजेरी. आपण आहे अशी हजेरी!

हा गुणज्ञान कसे निर्माण झाले हे आपण ऐकले. आता हाँ एकच गुण त्रिगुणात्मक होऊन कसा वागतो हे सांगताना श्री निसर्गदत्त म्हणतात:

आत एकच गुण, पण बाहेर तोच तीन होतो. तीन प्रकारे वावरतो. त्रिगुणांचा मुख्य गुण; ज्ञानगुण होय. या गुणानेच तुम्हाला सर्व कळते. जगातील सर्व गोष्टी..यंत्रे, घरे, रस्ते वगैरे कोण करते? कोणाचे तरी 'मी असल्याचे ज्ञान'च ना?

सत्व म्हणजे अन्नाचा रस. त्यातील गुण म्हणजे जाणीव. ती तीन प्रकारे वागते. रज,तम,सत्व. तीन गुण ही वागणुकीची नांवे आहेत. एकूण प्राण्यांमध्ये हे तीन गुण व्यवहारतात..स्वाभाविक म्हणजे आपेआप. सत्वाच्या गुणामुळे 'आपण आहे' अशी जाग.. त्याला जागृती म्हणायचे.

रजोगुणाला स्वप्नजग म्हणतात. मग ते जग बराच वेळ पाहिल्याने नशा चढते. जागृती पेलवत नाही म्हणून झोप येते, तो तमोगुण.

जागृती सर्वात जड. ती तोलवत नाही. सत्व, रज आणि तम...ही त्रिपदा गायत्री आहे. तीच सर्व बोलते वगैरे. देह अन्नधार्जीणा आहे. खाल्लेल्या अन्नाचा क्षार टाकून सत्व निर्माण होते. त्याची काया बनते. सत्वाचा रसगुण तो आपण असल्याचे ज्ञान आहे. देहसत्व कायारस पाझरते आहे. तो रोजच्यारोज खर्च होत आहे. म्हणून तुम्हाला भूक-तहान लागते. काया ही अन्नाची मूर्ती आहे. त्या अन्नाचे सत्व पाझरते. त्यात गुण निर्माण होतो. तिथे प्राण पण निर्माण होतो. प्राणाचे सर्व कार्य आहे. देह हा प्राणाचे अन्न आहे. व्यवहार करणे हा रजोगुण आहे आणि त्याची जमा घेणे...म्हणजे बरे केले, वाईट केले इत्यादी..हा तमोगुण आहे. आत्मज्ञान स्वतःच्या गुणावर लुब्ध आहे..म्हणजे जाणीवेला आपण टिकून असावेसे वाटते. तिन्ही गुण मिळून जाणवते आपणासी आपण. तम आणि रज गुणच काम करतात. सत्वगुण केवळ बघ्या! तुम्ही असल्याचे ज्ञान हा कायारुपी अन्नातील सत्वाचा गुण आहे. रजोगुण व्यवसायी. तमोगुण...केलेल्या व्यवसायाचा अभिमान घेणारा. 'गुण' आणि 'काया' याशिवाय काय आहे तुमच्याकडे?

एतां विभूतिं योगं च मम यो वेति तत्वतः |
सोऽविकम्पेन योगेन युज्यते नात्र संशयः||(अ.१०)

गीतेमध्ये विभूतियोग दशकात विभूतीसंबंधात वरील श्लोक येतो. कृष्ण भगवान अर्जुनाला म्हणतात सर्व माझीच विभूती! मीच सर्वाठाई भरलो आहे.

गुणाधीष्ठीत जाणीव सर्व चराचरात भरून उरली आहे. श्री निसर्गदत्त महाराज या गुणमय जाणीवेचे स्वरूप सांगताना म्हणतात:

मृगाच्या बेंबीत जसा वास असतो, तसे तुमच्या अंतर्यामीचा वासुदेव ओळखा. कायेत असलेले ज्ञान खाल्लेल्या अन्नाच्या रसात असते. त्या वासुदेवाचा वास येतो..आपण असल्याच्या जाणीवरूपाने. अन्नपाण्याअभावी प्राणाचे चलन-वलन कमी झाल्यास त्या वासुदेवाचा वासही कमी होऊ लागतो. देह असेपर्यंत तुम्हाला एकदा बघून घ्या. जगात म्हणण्याकरीता म्हण 'देवाचे दर्शन'..पण ते आपलेच दर्शन. आपल्या शब्दाचा अर्थ जाणणारे आपणच ना! देह हे तुमचे प्रत्यक्ष रूप नव्हे. कृष्ण म्हणतात सगळ्या विभूतीतील विभुत्व ते मी. भक्ती जीवेप्राणे केली पाहिजे. सर्व ठिकाणी 'मी आहे'! ठिकाण असेल तेही मीच आहे. ह्या विभूती माझ्या आहेत असे म्हणणारे कोण आहे? ...तुम्ही

असल्याची ज्ञानगंगा! बोल बोलणारा कोण आहे? काय आणि कसा आहे? याबद्दल साधुसंत बोलत असतात. प्रात:काळी अवांच्छित तुम्हाला देवाचे दर्शन घडत आहे. तुम्ही असल्याचा विभूतीगुण काय आहे हे कळल्यावर जे काय होते-जाते ते त्याच्याने होते हे तुम्हाला कळेल. काय होते-जाते ? ..तुम्हाला जे जे कळते ते ! दिसते-भासते त्या सर्व माझ्या विभूती म्हणणारे आपणच !

पुढचा शब्द **'क्षोभ'.** भडका! स्फोट! रागाचा अतिरेक झाला की सामान्यतः क्षोभ हा शब्द शोभून दिसतो. अतिक्रोधीत किंवा आजच्या भाषेत रागाचा स्फोट झाला! त्या शब्दातच सर्व अर्थ आला. अचानक स्फोट झाला म्हणजे त्यात सर्व आलेच. तसाच हा शब्द 'गुणक्षोभ'! निसर्गदत्त या गुणक्षोभाचे कसे विवरण करतात ते पाहूया:

गुणक्षोभ म्हणजे एकाएकी आपण असल्याची जाणवलेली जाणीव. हिच्यात अनंत ब्रह्मांडे खेळताहेत. हिचा जाणता कोण? वडील कोण? पाहाणारे कि दिसणारे ?..पाहाणारे !
गुणक्षोभ म्हणजे अकस्मात 'आपण आहे'से जाणवले. इथे गुण म्हणजेच आत्मा. गुणक्षोभानेच माया भासते. गुणक्षोभ जोपर्यंत झाला नव्हता तोपर्यंत माया नव्हती.

– अनिल चुबे, ठाणे(प)
९८१९२१४६६१

(क्रमशः पुढील अंकात ..)

सद्गुरू देहधारी व्यक्ती नव्हे! केवळ ज्ञानमूर्ती, ज्ञानस्वरूप.
नाही त्या गुण, आकार, म्हणून निर्गुण, निराकार.
त्याला जन्म-मरण कल्पू नका.

– श्री निसर्गदत्त महाराज





*The digital journey of **Nisargavaani** tri-monthly began last year with a single step into the vast world of technology. As we embark on this path, we find ourselves immersed in a realm where connectivity and information flow seamlessly across the globe. This journey will take us ahead to an ever-growing ways of communication, connectivity and responses. Embracing the digital journey means being open to change, committed to lifelong learning, and ready to harness the power of technology to bring about positive changes in numerous lives and create a brighter future for all.*